उपविभागीय अधिकारी,तथा भुसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय
फोन नं.०७२२३-२२७२०० फॅक्स क्र.०७२२३-२२७३११ ई-मेल sdo.achalpur@gmail.com

---

क्र/अका/भू.सं./कावी- १२१ /२०२० दिनांक :- ३१/०१/२०२०

---

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत**

## -: जाहीर नोटीस :-

**वाचा :-** म.शा.महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/ मंत्रालय, मुंबई ४०००० ३२ दिनांक २५/०१/२०१७

**भु.सं.प्र.क्र.०७/४७/२०१९-२०मौजा मेघनाथपूर ता.अचलपूर जि.अमरावती**

ज्याअर्थी **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांनी **पाझर तलाव मेघनाथपूर** ने बाधीत होणाऱ्या **मेघनाथपूर तलावाचे कामाकरीता** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५ /प्र.क्र.३४/अ-२/ दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे घेण्याबाबत त्यांचे **पत्र क्र.३५८०/१९ दिनांक २१.१२.२०१९ भुसंपादन प्रस्ताव क्र. ०७/४७/२०१९-२० मौजा मेघनाथपूर एकूण क्षेत्रफळ १.३५ हे.आर** प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे **आदेश क्र.८३५/१९ दिनांक २३.१२.२०१९** अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि तद्नुषंगीक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र.एलक्युएन-०१/२०१७ प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी **संदीपकुमार श.अपार, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर** याव्दारे -

### अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

### अनुसूची (दोन)

प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरीय समिती मार्फत भुसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकुण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

### अनुसूची (तिन)

संबधीत भुधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचे नांवे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधीत भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) **जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, अमरावती** यांचेकडे दाखल करावीत.

३) संमती पत्राचा (विकल्प) विहीत नमुना **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/ **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांचेमार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत **उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा) अचलपूर** यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भुधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची (एक)**

**भुसंपादन प्रकरण क्रमांक ०७/४७/२०१९-२० मौजा मेघनाथपूर ता.अचलपूर जि.अमरावती**

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ठ (खरेदी घ्यावयाच्या) जमीनीचा तपशिल

| अ.क्र. | भुधारकांचे नाव | राहणार | गट सर्व्हे क्रमांक | भुधारणा प्रकार | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.प्रल्हाद पाडुरंग मनवर | मेघनाथपूर | २६ | भो.वर्ग-१ | २.५४ | ०.७४ |
| २ | श्री.गोपाळराव अजाबराव मनवर | मेघनाथपूर | २५ | भो.वर्ग १ | २.०१ | ०.४१ |
| ३ | श्री.धनराज डोमाजी रावळे | मेघनाथपूर | २४ | भो.वर्ग १ | १.१२ | ०.२० |
| **एकूण** | | | | | **५.६७** | **१.३५** |

(संदीपकुमार श.अपार)
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी,**
**अचलपूर**